

‘आरोग्यसेवा घरोघरी पोहवण्याचा प्रयत्न’

» पान २ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



मुंबई इंडियन्सला दुसऱ्यांदा जेतेपद

» पान ४ वर

वेर्णा, सोमवार, १७ मार्च २०२५ । पाने ४ । ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 194 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 17 March 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### ग्वाल्हेर येथे रुग्णालयात भीषण आग

**भोपाल, दि. १६ :** मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर शहरातील एका सरकारी रुग्णालयात रविवारी पहाटे आग लागल्याची भीषण घटना समोर आली. या आगीच्या घटनेनंतर १९० हून अधिक रुग्णांना रुग्णालयातून वाचवण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, असेही अधिकार्‍यांनी सांगितले आहे. ग्वाल्हेरच्या जिल्हाधिकारी रुचिका चौहान यांनी या घटनेबद्दल माहिती देताना सांगितले की, कमला राजा रुग्णालयाती पहाटे १ च्या सुमारास स्त्रीरोग विभागाच्या अतिदक्षता विभागात (आयसीयू) एअर कंडिशनरमध्ये आग लागली. १९० हून अधिक रुग्णांना ज्यामध्ये १३ आयसीयूमधील रुग्णांचा देखील समावेश होता, या आगीतून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आणि दुसऱ्या रुग्णालया हलवण्यात आले, असेही अधिकार्‍यांनी सांगितले.

---

### ओडिशात उष्णतेची लाट; रेड अलर्ट

**भुवनेश्वर, दि. १६ :** रविवारी देशाच्या वेगवेगळ्या भागात हवामानाचे वेगवेगळे परिणाम दिसून आले. ओडिशाच्या बौधमध्ये तापमान ४२.५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले, जे देशातील सर्वाधिक आहे. उष्णतेमुळे ओडिशामध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

१४ राज्यांमध्ये पाऊस आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. दिल्लीतील तापमान ३३ अंश सेल्सिअस नोंदवले गेले होते, तर शुक्रवारी ते ३६.२ अंशांवर पोहोचले होते. दुसरीकडे, हिमाचल प्रदेशात बर्फवृष्टी आणि पाऊस सुरूच आहे. चार जिल्ह्यांतील उंच भागात हिमस्खलनाचा इशारा देण्यात आला आहे. पाऊस आणि बर्फवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे, अनेक रस्ते बंद झाले आहेत आणि लोकांना रुग्णालयात पोहोचण्यात अडचणी येत आहेत. देशात उष्णता, पाऊस आणि बर्फवृष्टीचे परिणाम एकाच वेळी दिसून येत आहेत, त्यामुळे पुढील काही दिवस हवामान आव्हानात्मक राहील.

---

### नाईटक्लबला आग; ५० ठार

**स्कोप्जे, दि. १६ :** युरोपीय देश उत्तर मॅसेडोनियामधील एका नाईट क्लबमध्ये शनिवारी रात्री लागलेल्या आगीत किमान ५० जणांचा मृत्यू झाला तर १०० हून अधिक जण जखमी झाले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, कोकानी शहरात आयोजित एका हिप हॉप संगीत मैफिल दरम्यान हा अपघात झाला. सुमारे ३०,००० लोकसंख्या असलेल्या या शहरातील एका नाईट क्लबमध्ये प्रसिद्ध हिप-हॉप जोडी एडीएनचा संगीत कार्यक्रम सुरू असताना आग लागली. या हिप-हॉप कॉन्सर्टसाठी क्लबमध्ये १५०० लोक जमले होते. कार्यक्रमादरम्यान कोणीतरी क्लबमध्ये फटाके फोडले, ज्यामुळे आग लागली, असा अंदाज आहे. आग लागल्यानंतर गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरीत काही लोक चिरडले गेले. उत्तर मॅसेडोनियासाठी हा एक कठीण आणि खूप दुःखद दिवस आहे. इतक्या तरुणांचे दुःखद नुकसान कधीही भरून निघू शकत नाही. या कठीण काळात पीडितांचे दुःख कमी करण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल.अधिकाऱ्यांनी सांगितले की, जखमींना राजधानी स्कोप्जेसह देशभरातील विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यामध्ये अनेक स्वयंसेवी संस्थांची मदतही घेतली जात आहे

### हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६ )

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# सर्वोच्च न्यायालयात जाणार नाही : विश्वजित राणे

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १६ : नगरनियोजन कायद्याच्या कलम १७ (२) बाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची घोषणा नगरविकास मंत्री विश्वजित राणे यांनी दोन दिवसांतच मागे घेतली आहे. उच्च न्यायालयाने केलेल्या निरीक्षणे आणि सुचवलेल्या सुधारणांचा विचार करून हे कलम नव्याने तयार करून ते करभारात आणले जाईल, असे राणे यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.**

उच्च न्यायालयाने १३ मार्च रोजी कलम १७ (२) अंमलात आणणाऱ्या नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे रद्द करत नगरनियोजन विभागाला मोठा झटका दिला होता. मात्र, राज्य सरकारच्या विनंतीवरून न्यायालयाने सहा आठवड्यांसाठी या निर्णयाची अंमलबजावणी स्थगित केली आहे. यासोबतच, या काळात राज्य सरकारला कोणत्याही नव्या परवानग्या देण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय मंत्री राणे यांनी तत्काळ घेतला होता. मात्र, दोन दिवसांतच त्यांनी आपला निर्णय मागे घेत सर्वोच्च न्यायालयात जाणार नसल्याचे शनिवारी रात्री जाहीर केले. यापूर्वी मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांच्याशी सविस्तर चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

मंत्री राणे यांनी स्पष्ट केले की, कलम १७ (२) संदर्भात न्यायालयाने केलेल्या निरीक्षणांचा आम्ही आदर करतो. न्यायालयाने सुचवलेल्या सुधारणा कशा अमलात आणायच्या, यासंदर्भात नगरनियोजन विभागाची बोर्ड बैठक बोलावली आहे. तज्ज्ञांशी सल्लामसलत करून योग्य बदल केले जातील आणि त्यानुसार पुढील निर्णय घेतला जाईल. १७(२) मध्ये सुधारणा करून त्याची अंमलबजावणी केली जाईल.

कलम १७ (२) हे घटनाबाह्य असल्याचे म्हणणे चुकीचे आहे. न्यायालयाने हे कलम घटनाबाह्य ठरवलेले नाही, तर त्यासंदर्भात सुधारणा सुचवल्या आहेत. प्रादेशिक विकास आराखड्यातील त्रुटी दूर करण्यासाठी १७ (२) शिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. विकास प्रक्रिया थांबू नये, हे सरकारचे कर्तव्य आहे, असेही राणे यांनी स्पष्ट केले.

उच्च न्यायालयाच्या निर्णयाला गोवा फाउंडेशनने जनतेचा विजय म्हटल्यावर राणे यांनी टीका केली. जर गोवा फाउंडेशनला उच्च न्यायालयाचा निर्णय समाधानकारक वाटत असेल, तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात जाणार नसल्याचे जाहीर करावे. काही स्वयंसेवी संस्था न्यायालयाच्या या निर्णयाचा स्वतःच्या सोयीप्रमाणे अर्थ लावत आहेत आणि नगरनियोजन विभागाविरोधात बदनामी मोहीम राबवत आहेत, असा आरोप त्यांनी केला. प्रादेशिक योजनेतील चुका सुधारण्यासाठी हे निर्णय आवश्यक आहेत. विकासप्रक्रिया योग्य मार्गावर आणण्यासाठी सुधारणा केल्या जातील. जनतेला त्रास देणे आता थांबले पाहिजे,असेही राणे म्हणाले. कलम १७(२) संदर्भात न्यायालयाने काही आक्षेप घेतले असले, तरी कलम ३९(र) बाबत न्यायालयाचा अभिप्राय सकारात्मक असल्याचा दावा मंत्री राणे यांनी केला आहे.

# उड्डाणपुलाच्या कामाला स्थगिती नसल्याचा गुदिन्हो यांचा दावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**दाबोळी, दि. १६ :** दाबोळी विमानतळाजवळील उड्डाणपुलाचे काम पूर्ण वेगाने सुरू असून विकास थांबवण्याचा कोणताही विचार नाही, असे स्पष्ट आश्वासन राज्याचे वाहतूक मंत्री माविन गुदिन्हो यांनी रविवारी दिले. मंजुरीच्या प्रक्रियेमुळे केवळ एका किंवा दोन भागांमध्ये किरकोळ विलंब झाला असला, तरी काम नियमितपणे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

याबाबत अधिक माहिती देताना गुदिन्हो यांनी स्पष्ट केले की, सध्या अधिकारी विद्यमान उड्डाणपुलाची उंची अडथळा मर्यादा पृष्ठभाग नियमांमध्ये येते का, याची पडताळणी करत आहेत. नियोजित उंची ’ओएलएस’ नियमांचे उल्लंघन करत नसेल, तर कोणतेही बदल न करता काम सुरू राहील. मात्र, जर समायोजन आवश्यक ठरले, तर भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि भारतीय नौदलाशी सल्लामसलत करून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण त्यानुसार उंचीत बदल करेल.

गुदिन्हो यांनी ठामपणे सांगितले की, उड्डाणपूल थांबवण्याचा किंवा गोव्यातील विकास रोखण्याचा कोणताही विचार सरकारच्या मनात नाही. हा प्रकल्प वाहतूक कोंडी सोडवण्यासोबतच रस्ते संपर्क सुधारण्यास मदत करणार आहे.

गुदिन्हो यांनी दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांचे नाव न घेता त्यांच्यावर जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप केला. काही नकारात्मक घटक अनावश्यक वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. ते एक छोटासा मुद्दा उचलतात आणि त्याला अनावश्यक महत्त्व देतात. मात्र, लोकांचा त्यांच्यावर विश्वास राहिलेला नाही. जनतेला गोवा सरकार आणि विकासावर पूर्ण विश्वास आहे, असे त्यांनी नमूद केले.

गुदिन्हो यांनी मुरगाव बंदर प्राधिकरणाकडून येणाऱ्या जड वाहतुकीबाबतही चिंता व्यक्त केली. या टीकाकारांना वाहतूक कोंडी आणि संभाव्य अपघातांबाबत काहीच चिंता आहे का? त्यांना सर्व जंक्शनवर वाहतूक कोंडी हवी आहे का, ज्यामुळे स्थानिकांना गैरसोय होऊ शकते? असा सवाल त्यांनी केला. सरकार उड्डाणपुलाचे काम नियोजनानुसार वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. हा प्रकल्प वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी आणि नागरिकांच्या दैनंदिन सोयीसाठी महत्त्वाचा आहे, असे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.

# पाकिस्तानातील बस हल्ल्यात ९० लष्करी जवान ठार ?

## बलुच लिबरेशन आर्मीने स्वीकारली जबाबदारी

इस्लामाबाद, दि. १६ :

पाकिस्तानातील राष्ट्रीय महामार्ग ४० जवळ लष्करी अधिकाऱ्यांची बस कारला धडकल्याने किमान ९० पाकिस्तानी लष्करी जवानांचा मृत्यू झाला आहे. अलिकडच्या रेल्वे अपहरण प्रकरणात गुंतलेल्या बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

रविवारी क्वेट्टाहून तफ्तानला जाणाऱ्या लष्करी ताफ्यावर हा हल्ला करण्यात आला. हल्ल्यात किमान सात पाकिस्तानी सैनिक ठार झाले आणि २१ जण जखमी झाल्याची पुष्टी अधिकृत सूत्रांनी केली असली तरी बलुच लिबरेशन आर्मीने हल्ल्यात ९० लष्करी जवान ठार झाल्याचा दावा केला आहे.

एका पाकिस्तानी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, सात बस आणि दोन वाहनांचा समावेश असलेल्या लष्करी ताफ्यावर



आयईडीने भरलेल्या वाहनाने जोरदार धडक दिली. हा आत्मघातकी हल्ला असल्याचा संशय आहे. त्याचवेळी दुसऱ्या बसवर रॉकेट-प्रोपेल्ड ग्रेनेड्स ने हल्ला करण्यात आला.

यापूर्वी, बीएलएने एका रेल्वेवर हल्ला करून सुमारे ४०० प्रवाशांना ओलीस धरले होते. त्या घटनेत पाकिस्तान सरकारने २६ अपहरणकर्त्यांना ठार केल्याचा दावा केला होता, तर बचाव मोहिमेदरम्यान सर्व ३३ हल्लेखोर ठार केल्याचेही स्पष्ट करण्यात आले होते.

तेल आणि खनिज संपत्तीने समृद्ध बलुचिस्तान हा पाकिस्तानमधील सर्वात मोठा आणि कमी लोकसंख्या असलेला प्रांत आहे. मात्र, बलुचिस्तानमधील स्थानिक रहिवासी दीर्घकाळापासून सरकारवर भेदभावाचा आरोप करत आहेत. बीएलए संघीय सरकारपासून स्वातंत्र्याची मागणी करत आहे.

हल्ल्याच्या तपासात सहभागी असलेल्या नोशकी पोलीस ठाण्याचे एसएचओ जफरउल्लाह सुलेमानी यांनी माध्यमांना सांगितले की, प्राथमिक तपासात हा आत्मघातकी हल्लाअसल्याचे दिसत आहे. घटनास्थळावरून जमा केलेल्या पुराव्यांवरून हल्लेखोराने जाणूनबुजून स्फोटकांनी भरलेले वाहन लष्करी ताफ्यावर धडकवल्याचे स्पष्ट झाले आहे.

बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बलुच लिबरेशन आर्मीच्या फिदाई युनिट माजीद ब्रिगेडने नोशकी येथील आरसीडी महामार्गावर पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर हल्ला केला. ताफ्यातील आठ बसपैकी एक बस स्फोटात पूर्णपणे नष्ट झाली. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरू असून, जखमींना जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# गोवा विद्यापीठात प्रश्नपत्रिका चोरी प्रकरणी खळबळ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १६ :** गोवा विद्यापीठात एका प्राध्यापकाने खास विद्यार्थिनीला मदत करण्यासाठी प्रश्नपत्रिका चोरल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, विद्यापीठ प्रशासनाने याप्रकरणाची चौकशी सुरू केल्याची माहिती कुलगुरू प्रा. डॉ. हरिलाल मेनन यांनी दिली.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ शेट्ये यांच्यासह इनासियो परेरा, रामचंद्र मांजरेकर, जॉन नाझरेथ, प्रेमिंद्र वेर्णेकर, कृष्णा पंडित आणि मारियानो फेराव यांनी आगशी पोलिस स्थानकात तक्रार नोंदवली आहे. संबंधित प्राध्यापकासह विद्यापीठातील उच्चपदस्थ अधिकारी आणि एका राजकीय नेत्याचा या प्रकरणात सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारदारांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

काशिनाथ शेट्ये यांनी सांगितले की, २४ तासांत कारवाई न झाल्यास दोन दिवसांनी उत्तर गोवा पोलिस अधीक्षकांकडे धाव घेण्यात येईल. त्यानंतरही कारवाई झाली नाही तर न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्यात येतील.

तक्रारीनुसार, गोवा विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील एका सहाय्यक प्राध्यापकाने परीक्षेच्या काही दिवस आधी विभागातील इतर प्राध्यापकांच्या केबिनमध्ये बनावट चाव्यांच्या मदतीने प्रवेश केला. संगणक सुरू करून त्यांनी प्रश्नपत्रिका मिळविल्या आणि त्या आपल्या खास विद्यार्थिनीला दिल्या. यामुळे ती विद्यार्थिनी परीक्षेत उच्च गुणांनी उत्तीर्ण झाली.

या प्रकारानंतर संशय वाढल्याने विभागातील इतर प्राध्यापकांनी विद्यार्थिनीच्या उत्तरपत्रिकांची तपासणी केली. त्यानंतर चौकशी सुरू झाली असता, प्राध्यापकाचा या प्रकरणातील सहभाग उघडकीस आला. मात्र, विद्यापीठ प्रशासनाने केवळ तंबी देऊन त्यांना सोडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विद्यार्थिनीला प्रश्नपत्रिका मिळूनही तिच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे, विद्यापीठ प्रशासनाने परीक्षा रद्द करून नव्याने प्रश्नपत्रिका तयार केल्या नाहीत. कुलगुरूंनी या प्रकरणात कोणतीही ठोस कारवाई केली नसल्यामुळे विद्यापीठाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या विद्यार्थिनीला प्रश्नपत्रिका मिळवून देण्यात एका राजकीय नेत्याचा हात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या विद्यार्थिनीने नंतरच्या परीक्षेत कमी गुण मिळविल्याने तिच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रकरणाची चौकशी करून संबंधित प्राध्यापक आणि विद्यार्थिनीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

विद्यापीठ प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, कुलगुरू प्रा. मेनन यांनी सोमवारी याप्रकरणाची चौकशी सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला धोका निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रकाराची प्रशासनाकडून पाठीशी घालण्यात येणार नाही,असे कुलगुरूंनी स्पष्ट केले आहे.

# सोन्याचे दर कमी होण्याची शक्यता मंदावली

## अमेरिकेच्या टॅरिफ वॉरमुळे सोन्याच्या खरेदीकडे गुंतणूकदारांचा कल वाढला

वॉशिंग्टन, दि. १६ :

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे निर्माण झालेल्या आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी सुरक्षित-निवास मालमत्तेकडे वळण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे शुक्रवारी प्रथमच सोन्याने प्रति औंस ३ हजार अमेरिकन डॉलरचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला. सत्राच्या सुरुवातीला स्पॉट गोल्डने ३००४.८६ डॉलर चा विक्रमी उच्चांक गाठला. मात्र, नंतर नफा-वसुलीमुळे किंमतीत ०.१ टक्क्याने घट होऊन ते २९८६.२६ डॉलर वर स्थिरावले. अमेरिकन सोन्याच्या वायदेबाजारात किंमतीत ०.३ टक्याने वाढ होऊन ३००१.१० डॉलर वर बंद झाला.



सोन्याच्या किमतीतील या उसळीसाठी ट्रम्प प्रशासनातील शेअर बाजारातील अस्थिरता कारणीभूत असल्याचे प्रमुख सोने व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांमुळे शेअर बाजारात गोंधळ निर्माण झाला असून, त्यामुळे गुंतवणूकदारांनी सुरक्षित मालमत्ता म्हणून सोन्याकडे वळण्याचा निर्णय घेतला आहे असे या व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. सोन्याच्या किमतींमध्ये यंदाच्या वर्षात आतापर्यंत १४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ट्रम्प प्रशासनाच्या टॅरिफ धोरणांमुळे निर्माण झालेल्या आर्थिक अस्थिरतेमुळे गुंतवणूकदारांनी सोन्याकडे आकर्षित होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सोन्याच्या किमतींना मध्यवर्ती बँकांच्या मागणीचा मोठा आधार मिळत आहे. चीनने फेब्रुवारीत सलग चौथ्या महिन्यात सोन्याचा साठा वाढवला आहे. गोल्डकोरचे सीईओ डेव्हिड रसेल यांच्या म्हणण्यानुसार अमेरिकन डॉलरमधील अस्थिरतेमुळे मध्यवर्ती बँका सोन्याची खरेदी सातत्याने वाढवत आहेत. यूएस फेडरल रिझर्व्हकडून आर्थिक सुलभतेच्या अपेक्षांमुळे देखील सोन्याच्या किमतींना आधार मिळाला आहे. व्यापाऱ्यांनी जून महिन्यात व्याजदर कपात होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

वर्ल्ड गोल्ड कौन्सिलचे जागतिक संशोधन प्रमुख जुआन कार्लोस आर्टिगास यांच्या म्हणयानुसार , गुंतवणूकदारांची मागणी आगामी काळातही मजबूत राहण्याची शक्यता आहे. भू-राजकीय आणि आर्थिक अस्थिरता, उच्च महागाई आणि कमी व्याजदर यामुळे सोन्याची मागणी टिकून राहीलअसे त्यांचे म्हणणे आहे.

गोल्डमन सॅक्सच्या अंदाजानुसार, २०२५ च्या अखेरीस सोन्याची किंमत ३१०० डॉलर ते ३३०० डॉलर प्रति औंस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. रशिया-युक्रेन युद्धानंतर देखील मध्यवर्ती बँकांची सोन्याची खरेदी उच्च राहील, असे गोल्डमन सॅक्सने स्पष्ट केले आहे. भारतातील सोन्याचे दर जागतिक बाजारातील ट्रेंडवर अवलंबून आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दरांमध्ये होणारे कोणतेही बदल देशातील सोन्याच्या किमतीवर थेट परिणाम करतात. महागाई, भू-राजकीय तणाव आणि आर्थिक स्थिरता यासारखे घटक जागतिक सोन्याच्या दरांवर परिणाम करतात. भारत मोठ्या प्रमाणात सोने आयात करतो. आयात शुल्क आणि कर धोरणांचा भारतातील सोन्याच्या किमतीवर परिणाम होतो. जर सरकारने आयात शुल्क वाढवले तर सोन्याच्या किमती वाढतात. त्याचप्रमाणे सोन्याच्या साठ्याशी संबंधित धोरणांचाही दरांवर परिणाम होतो.

जागतिक स्तरावर सोन्याचा व्यापार अमेरिकन डॉलरमध्ये होतो. जर भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत कमकुवत झाला तर सोन्याची आयात महाग होते, ज्यामुळे किंमत वाढू शकते. दुसरीकडे, रुपया मजबूत झाल्यास सोन्याचा दर कमी होऊ शकतो.

जेव्हा महागाई वाढते तेव्हा गुंतवणूकदार चलन अवमूल्यनापासून बचाव करण्यासाठी सोन्याला प्राधान्य देतात. यामुळे सोन्याची मागणी वाढते आणि किमती वाढतात. त्याचप्रमाणे कमी व्याजदरांमुळे सोने गुंतवणूक म्हणून अधिक आकर्षक बनते, ज्यामुळे किमतीच्या ट्रेंडवर परिणाम होतो.

जागतिक अनिश्चितता, जसे की मंदी, साथीचे रोग आणि भू-राजकीय तणाव, सोन्याच्या किमतींवर परिणाम करू शकतात. जेव्हा शेअर बाजार चढ-उतार होतात तेव्हा गुंतवणूकदार सुरक्षित संपत्ती म्हणून सोन्याकडे वळतात, ज्यामुळे मागणी आणि किमती वाढतात.

स्थानिक कर, वाहतूक खर्च आणि ज्वेलर्सनी लादलेले मेकिंग चार्जेस यामुळे सोन्याचे भाव शहरांनुसार वेगवेगळे असतात.सोन्याच्या साठ्याशी संबंधित धोरणे, सोन्याच्या आयातीवरील निर्बंध आणि सॉव्हरेन गोल्ड बॉन्ड्ससारख्या गुंतवणूक योजनांमध्ये बदल यांचा किमतींवर परिणाम होतो.